# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

फोन : २५६२१२४४/४५

ई-मेल: fao@unipune.ac.in

नवीन प्रशासन भवन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-४११ ००७.


### परिपत्रक क्र. १८७ /२०२५

सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सन २०२५-२६ साठी आयकराची कर आकारणी करण्यासाठी आयकर विभागाने दोन पर्याय उपलब्ध करून दिलेले आहेत. या दोन पर्यायापैकी एक पर्याय निवडण्याची संधी उपलब्ध आहे. त्यानुसार प्रत्येक सेवकाची दोन वेगवेगळया करप्रणालीमध्ये करगणना करून ती एच. आर. सिस्टीममध्ये (H. R. System) उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर परिगणनेनुसार सेवकांनी फायदेशीर व योग्य वाटणारा पर्याय निवडावा. त्यानुसार जुलै २०२५ च्या वेतनापासून करकपात करण्यात येणार आहे.

पर्यायाची निवड आपली बचत, गृहकर्ज परतावा इ. गोष्टींचा विचार करून करावी. एकदा निवडलेला पर्याय पुन्हा बदलता येणार नाही. सदर पर्याय दिनांक २४/०७/२०२५ अखेरपर्यत निवडावयाचा असून सेवकांनी दिलेल्या वेळेतच सदर पर्यायाची निवड करावी, जेणेकरून जुलै २०२५ चे वेतन वेळेवर अदा करणे सोईचे होईल. जे सेवक पर्यायाची निवड करणार नाहीत, त्यांची कर आकारणी जुन्या पर्यायाप्रमाणे होईल, याची नोंद घ्यावी. पर्याय निवडताना काही अडचणी आल्यास वेतन विभागाशी संपर्क साधावा.

पुढे असेही सूचित करण्यात येते की, वित्त व लेखा विभागाचे परिपत्रक क्रमांक २८९/२०२३ दि.२४/११/२०२३ नुसार आपला पॅन क्रमांक हा आधार क्रमांकाला लिंक असल्याची खातरजमा करण्याबाबत कळविण्यात आले होते. ज्या सेवकांनी अद्याप त्यांचा पॅन क्रमांक हा आधार क्रमांकाला लिंक केलेला नाही त्यांनी तो तात्काळ लिंक करावा. जर आपला पॅन क्रमांक निष्क्रिय (Inoperative) असल्यास करकपात करण्याबाबत आयकर विभागाकडून त्रुटी आढळल्यास याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत सेवकाची राहील व त्याची करकपात सर्वोच्च (सद्यस्थितीत २०%) दराने केली जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

(सीएमए (डॉ.) चारूशीला गायके)
वित्त व लेखा अधिकारी

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जावक क्र. वित्त /२०२५-२६/
दिनांक : ०९/०७/२०२५

**प्रत माहितीसाठी :**

१) मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
२) मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

) सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.